# एस. एच. बिहारी - भाग १



हिंदी चित्रपटसृष्टीसाठी ज्यांनी उत्तमोत्तम गाणी रचली, त्या गीतकारांमध्ये शम्सऊल हुदा यांच्या नावाची निःसंशय गणना करता येईल. त्यांपैकी काही गाण्यांचा मी या प्रकरणात उल्लेख केला आहे.

साधारणपणे ५० च्या दशकात एस. एच. बिहारी यांच्या कारकीर्दीला सुरुवात झाली. तेव्हा 'बेदर्दी' (संगीतकार रोशन), 'खूबसूरत' (मनमोहन), 'रंगीला' (जमाल सेन) आणि 'डाकूकी लडकी' (हेमंतकुमार) या चित्रपटांसाठी त्यांनी गीते लिहिली. परंतु राम गांगुली यांनी संगीतबद्ध केलेल्या १९५४ च्या 'गवैय्या' या चित्रपटातील 'तेरी याद का दीपक जलना है' ह्या सुरेंद्र आणि तलत यांनी स्वतंत्रपणे गायलेल्या गीतामुळे ते प्रकाशझोतात आले. तरीही ह्या काळात त्यांना अपेक्षित असे यश मिळू शकले नाही.

अखेर शेवटी हेमंतकुमार यांनी संगीत दिलेल्या १९५४ च्या 'शर्त' चित्रपटाद्वारे त्यांनी बाजी मारली. 'ना ये चाँद होगा, न तारे रहेंगे' (गीता, हेमंत), 'देखो ये चाँद चुपके करता है क्या इशारे' (हेमंत, लता) आणि अत्युत्तम 'मेरी तकदीर के मालिक, मेरा कुछ फैसला कर दे' (लता) ह्या एक से एक गाण्यांनी 'शर्त' चित्रपटाला उदंड यश दिले. पुढच्याच वर्षी त्यांनी बुलो सी रानी यांनी संगीत दिलेले व तलत आणि रफी यांनी गायलेले 'कभी आँसू बहाते है' हे भावपूर्ण द्वंद्वगीत 'मधुर मीलन' या चित्रपटासाठी लिहिले.

बिहारी यांनी हेमंतकुमार यांच्यासाठी जास्तीत जास्त गाणी लिहिली. त्यांपैकी १९५७ च्या 'एक झलक'

या चित्रपटातील तर सगळी गीते त्यांनीच लिहिली होती. ‘ये हसता हुआ कारवाँ जिंदगी का ना पूँछो चला है किधर’ (हेमंत, आशा), ‘आजा जरा ... दिल के सहारे दिलरुबा’ (हेमंत, गीता), ‘चल बादलोंसे आगे’ (हेमंत आणि आशा) आणि ‘गोरी चोरी-चोरी जाना बुरी बात है’ (हेमंत) ही श्रवणीय गाणी त्याच चित्रपटातील आहेत. पुन्हा त्याच वर्षी हेमंतकुमार यांच्यासाठी त्यांनी ‘हिल स्टेशन’ मधील गाणी लिहिली. ‘नयी मंझिल, नयी राहे, नया है मेहेरबान अपना’ (लता आणि हेमंत) आणि ‘वोह खुशनसीब है जिसको यहाँ करार मिला’ (हेमंत) ही भावपूर्ण गाणीही त्याच चित्रपटातील आहेत. परत हेमंतकुमारांसाठीच ‘यहुदी की लडकी’ मध्ये गीता दत्तने लडिवाळपणे म्हटलेले ‘चार दिन की है बहार-ए-जिंदगी’ हे गाणेही त्यांचेच आहे.

हेमंत यांना काही चित्रपटांत सहाय्यक असलेले रवि हे आपल्या ‘दिल्ली का ठग’ आणि ‘घरसंसार’ (१९५८) या चित्रपटासाठी गीतकार म्हणून त्यांना अगदी ’वारसाहक्काने’ घेऊन गेले. ‘घरसंसार’ चित्रपटातील आशासाठी संगीतबद्ध केलेली ‘सपनोंकी डोर बाँधी, पलकोंका पालना’ ही अवर्णनीय अंगाई बिहारी यांनीच लिहिलेली आहे. तसेच रफीच्या गळ्यातील ‘भला करनेवाले भलाई किये जा’ हे सुंदर गाणे त्यांचेच. त्यांनी रविसाठी ‘अपना बनाके देखो’ या चित्रपटाचे ‘हम प्यार तुम्हे करते है’ (रफी आणि आशा) हे शीर्षकगीतही समर्पकपणे लिहिले आहे.

(क्रमश:)

**- माणेक प्रेमचंद**

('Yesterday's Melodies Today's Memories' या पुस्तकातून.)

**NOTE:** Among the many things India can be proud about is the wonderful music that was made in the Hindi cinema of yesteryear. Songs that touched (and still touch) the hearts of many millions of people who understand Hindustani. No matter where we were, inside or outside the country, and whether we were old or young, rich or poor, fat or thin, there were songs that kept us enjoying them. Or making life more bearable, at the least. “Yesterday's Melodies Today's Memories” is a biographical salute to all the main singers, composers, and songwriters who put out these melodies, from the start in 1931, till about 1970.

Manek Premchand's second book was “Musical Moments From Hindi Films”, which celebrated 75 years of sound (and music) in Hindi Films. The author next wrote another music book called “Romancing The Song”, which traces the history and changing face of lyrics in Hindi Cinema, right from 1931 till now.

After that, he wrote a third of the biography of the santoor maestro Pandit Shiv Kumar Sharma, outlining in some details the great musician's role in Hindi cinema, both as an instrumentalist and a composer.

His latest book "Talat Mahmood, The Velvet Voice" was released in May 2015. To buy his books, or otherwise write to the author, his email address is manekpremchand@gmail.com